# ३. लोकशाही

१) प्रस्तावना

शासनाच्या प्रकारातील सर्वात महत्वाचा प्रकार म्हणजे लोकशाही होय. लोकशाहीचा उदय व विकास इंग्लं-डमध्ये झालेला आहे. त्यामुळे इंग्लंडला संसदीय लोकशाहीची जननी म्हटले आहे. इंग्लडप्रमाणेच अमेरिका भारत, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, स्विट्झर्लंड, इत्यादी देशात लोक-शाहीचा स्विकार करण्यात आला आहे. लोकशाहीमध्ये लोकांच्या हातामध्ये सत्ता असते. जनता सार्वभौम असते. जनतेचा सर्वांगिण विकास लोकशाहीमध्येच होतो. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, शांतता, सहकार्य इत्यादी नैतिक मुल्यावर लोकशाही व्यवस्था आधारलेली असते.

२) लोकशाहीचा अर्थ व व्याख्या -

लोकशाहीला इंग्रजीमध्ये Democracy असे म्हणतात. Democracy हा शब्द Demo आणि crecy या शब्दापासून बनला आहे. Demo चा अर्थ जनता व crecy चा अर्थ शासन असा होतो. यावरून जनतेचे शासन म्हणजे लोकशाही होय. असा सरळ, सोपा, साधा अर्थ लोकशाहीचा सांगितला आहे.

स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, शांतता, सहकार्य इत्यादी नैतिक मुल्यांचा स्विकार करणारी व्यवस्था म्हणजे लोकशाही होय. ज्या शासनामध्ये लोकांचा निर्णय प्रक्रीयेत प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभाग असतो. त्याला लोकशाही असे म्हणतात. तसेच लोकांच्या मनाचा विचार ज्या शासनव्यवस्थेत केला जातो, त्यास लोकशाही असे म्हणतात.

१) अब्राहम लिंकनच्या मते, -

लोकांनी लोकांच्या कल्याणासाठी चालविलेले शासन म्हणजे लोकशाही होय.

Scanned with CamScanner

2) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते,-
ज्या शासनव्यवस्थेमध्ये क्रांतीशिवाय, रक्तपाताशिवाय, शांततेच्या मार्गाने, निवडणुकीच्या माध्यमातून शासनामध्ये बदल होतो, त्याला लोकशाही असे म्हणतात.

3) प्रो. सीलीच्या मते,-
ज्या शासनव्यवस्थेत प्रत्येकाचा सहभाग असतो त्यास लोकशाही असे म्हणतात.

4) लॉर्ड. ब्राईस-
राज्याची सत्ता कोणत्याही ठराविक वर्गाच्या हातात नसून समाजातील सर्वच लोकांच्या हातामध्ये असते, त्यास लोकशाही असे म्हणतात.

3) व्याख्येवरून निष्कर्ष-
लोकशाहीमध्ये लोकांच्या हातात सत्ता असते.
लोकशाहीत स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता असते.
लोकशाहीत चर्चेद्वारे बहुमताच्या आधारावर निर्णय घेतला जातो.
जात, धर्म, वंश, लिंग इत्यादीच्या आधारावर भेदभाव केला जात नाही.
लोकांच्या हिताचा व कल्याणाचा विचार केला जातो.

4) लोकशाहीची वैशिष्ट्ये / लक्षणे / तत्वे -
1) व्यक्तीला महत्व-
लोकशाहीमध्ये व्यक्तीला किंवा जनतेला महत्व असते. जनता किंवा व्यक्ती हाच लोकशाहीचा केंद्रबिंदू आहे. लोकांच्या इच्छेनुसार सरकारची निर्मिती केली जाते. लोकांच्या हातामध्येच सत्ता असते. लोकशाहीमध्ये जनता सर्वश्रेष्ठ सार्वभौम असते. व्यक्तीच्या हिताच्या दृष्टीने

Scanned with CamScanner

लोकशाही शासनामध्ये निर्णय घेतला जातो. धोरण आख -ताना जनतेच्या मताचा विचार केला जातो.

2) स्वातंत्र्य-

व्यक्तीला जन्मतःच स्वातंत्र्य प्राप्त झालेले असते. व्यक्तीला बोलण्याचा, जीवन जगण्याचा इ. गोष्टीचे स्वातंत्र्य असते. यावर कोणाचेही बंधन नसते. तो स्वतःच्या इच्छे -नुसार वागत असतो.

3) समता -

समता हा लोकशाहीचा आधारभूत घटक आहे. लोकशा -हीचा पाया आहे. समतेशिवाय लोकशाहीचा विचारही करता येत नाही. समता म्हणजे व्यक्तीला जे अधिकार आणि स्वातंत्र्य प्राप्त झाले ते कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान देणे.

4) न्याय -

न्याय हे लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे. यामध्ये कोणत्या -ही प्रकारचा भेदभाव केला जात नाही. सर्वांना समान संधी दिली जाते. व नैतिकतेने चांगल्या तत्वाचे पालन केले जाते.

5) अधिकार आणि हक्क -

अधिकार हे समाजात निर्माण होत असतात. समाजाशिवाय अधिकाराचा वापर करता येत नाही. अधिका -राबरोबर हक्क जोडलेले असतात.

6) बंधुता -

लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये प्रत्येकजण बंधुभावाने वागत असतो. एकमेकांना सहकार्य केले जाते. ऐक्याची भावना निर्माण होते. नागरिकांना त्याच्या इच्छेनुसार वागण्याचा अधिकार दिल्यास स्वातंत्र्य, समता, न्यायाचा स्विकार केल्यास समाजामध्ये बंधुत्वाची भावना निर्माण होते.

Page No.
Date: / /

7) शांततेच्या मार्गावर विश्वास-
लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये शांततेला महत्वाचे स्थान असते. शांततेच्या मार्गानेच लोकशाही सरकारमध्ये बदल होतो. रक्तपात किंवा कोणत्याही प्रकारची क्रांती न करता निवडणुकीच्या मार्गाने एका व्यक्तीच्या हातातील सत्ता जाऊन, दुसऱ्या व्यक्तीच्या हातात सत्ता येते. धोरण आखताना, विकासाची योजना लागू करताना शांततेच्या मार्गाचा अवलंब केला जातो. हिंसा, अशांतता, गोंधळ, गडबड, रक्तमय क्रांती, याला लोकशाहीमध्ये स्थान नसते.

8) चर्चेद्वारा निर्णय/ बहुमताच्या आधारे निर्णय-
लोकशाहीमध्ये चर्चेच्या बहुमताच्या आधारावर निर्णय घेतला जातो. कायदयाची निर्मिती करताना त्यावर उलट-सुलट, योग्य-अयोग्यतेचा विचार करून बहुमताच्या आधारे निर्णय घेतला जातो.

9) राजकीय विकेंद्रीकरण-
लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये सत्तेच्या केंद्रीकरणाऐवजी विकेंद्रीकरणाचा स्विकार केला जातो. राजकीय विकेंद्रीकरणामध्ये सत्ता एका व्यक्तीच्या हातामध्ये न राहता ती अनेक व्यक्तीच्या हातामध्ये दिली जाते.

5) लोकशाहीचे प्रकार-
I प्रत्यक्ष लोकशाही-
प्रत्यक्ष लोकशाही म्हणजे जनता किंवा लोक प्रत्यक्षपणे राज्यकारभारात भाग घेतात, निर्णय प्रक्रीयेत, कायदा निर्मितीमध्ये भाग घेतात. त्यास प्रत्यक्ष लोकशाही असे म्हणतात. ज्या देशाची लोकसंख्या कमी आहे.

Scanned with CamScanner

त्या देशामध्ये प्रत्यक्ष लोकशाहीचा प्रयोग यशस्वी होतो. सध्या प्रत्यक्ष लोकशाही स्वित्झर्लंडमध्ये आहे.

1) लोकनिर्णय -

कायदेमंडळात तयार केलेल्या किंवा मंजूर केलेल्या विधेयकावर जनतेचे मत जाणून घेणे, लोकांचा सल्ला, निर्णय म्हणजे लोकनिर्णय होय. कायदेमंडळाने तयार केलेले विधेयक लोकांकडे पाठवले जाते लोकांनी त्यास मान्यता दिल्यास त्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होते. लोकनिर्णयाचे 1) ऐच्छिक लोकनिर्णय 2) अनिवार्य लोकनिर्णय असे दोन प्रकार सांगितले आहेत.

a) ऐच्छिक लोकनिर्णय -

जनतेने जर एखादया विधेयकावर लोकनिर्णय घ्यावा अशी मागणी केली तर ते विधेयक लोकनिर्णयासाठी पाठविण्यात येते. त्यासाठी काही विशिष्ट लोकांचा पाठिंबा असणे आवश्यक आहे. यालाच ऐच्छिक लोकनिर्णय असे म्हणतात. लोकांनी मागणी केली नसेल तर त्या विधेयकाचे आपोआपच कायद्यात रूपांतर होते.

b) अनिवार्य लोकनिर्णय -

कायदेमंडळाने केलेले काही विधयके लोक निर्णयसाठी पाठविण्यात येते. ते आवश्यक असते. त्याला अनिवार्य लोकनिर्णय असे म्हणतात. उदा. घटनादुरुस्तीचे विधेयक लोकांच्या संमतीसाठी पाठविणे अनिवार्य असते.

2) विधी उपक्रम -

जनतेला एखादया कायदयाची आवश्यकता असल्यास, जनता कायदेमंडळात या संबंधित विषयावर कायदा करण्याची सुचना करु शकते. यास विधी उपक्रम असे म्हणतात. जनता विधेयकाचा आराखडा तयार करुन कायदेमंडळाकडे पाठविते. कायदेमंडळाला त्यावर कायदा करावाच लागतो, त्यास विधीउपक्रम असे म्हणतात. विधीउपक्रमाचे पुढील प्रकार पडतात.

a) निर्मित विधी उपक्रम-

जनतेला एखादया कायदयाची आवश्यकता भासल्यास त्या कायदयाची सविस्तर निर्मिती जनता करते. त्याचे नियम, उपनियम तयार करते. कायदेमंडळाला जनतेने तयार केलेल्या आराखडयाला मान्यता दयावी लागते. त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार कायदेमंडळाला नाही. कायदेमंडळानी त्याला मान्यता दिल्यास परत तो आराखडा किंवा विधेयक जनतेच्या संमतीसाठी पाठविले जाते.

b) अनिर्मित विधी उपक्रम -

जनतेला एखादया कायदयाची आवश्यकता भासल्यास त्याबाबत सविस्तर आराखडा तयार न करता केवळ महत्वाच्या तत्वांचा किंवा घटकांचा उल्लेख करुन ते कायदेमंडळाकडे पाठविले जातात. कायदेमंडळ त्या तत्वाच्या किंवा घटकाच्या आधारावर सविस्तर कायदा तयार करते, कायदयाला मान्यता देते व परत जनतेकडे पाठविले जाते, त्यास अनिर्मित विधी उपक्रम असे म्हणतात.

३) प्रत्यावर्तन / प्रतिनिधींना परत बोलावणे-

जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी योग्य कार्य करत नसतील, आपले कर्तव्य योग्य रीतीने

Page No.
Date: / /

पार पाडत नसतील, जनतेच्या समस्या किंवा प्रश्न योग्य रीतीने सोडवत नसतील, अनैतिकतेचा, भ्रष्टाचाराचा वापर करत असतील, तर त्या प्रतिनिधींना परत बोलावण्याचा किंवा सदस्यत्व रद्द करण्याचा अधिकार जनतेला असणे म्हणजे प्रत्यावहन होय.

4) सार्वमत-

एखादया महत्वाच्या प्रश्नांवर निर्णय होताना लोकमताचा विचार करून निर्णय घेणे म्हणजे सार्वमत होय. एखादया निर्णयाबाबत किंवा प्रश्नाबाबत जनतेचा दृष्टिकोन किंवा भुमिका काय हे अजमावून घेणे म्हणजे सार्वमत होय.

अप्रत्यक्ष लोकशाही-

राज्यकारभारामध्ये किंवा कारभारामध्ये जनता प्रत्यक्षरीत्या सहभागी न होता एका प्रतिनिधीची निवड करून शासन कारभार करण्यासाठी त्याला नियुक्त करते, त्यास अप्रत्यक्ष लोकशाही असे म्हणतात. जनतेऐवजी जनतेचे प्रतिनिधी प्रत्यक्षपणे राज्यकारभार करण्यासाठी त्याला पाठवि-ले. त्याला अप्रत्यक्ष लोकशाही असे म्हणतात. जास्त लोकसं-ख्या असलेल्या देशात लोकशाहीचा प्रयोग यशस्वी होतो. उदा. भारत, अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, कॅनडा इ. देशामध्ये अप्रत्यक्ष लोकशाहीचा स्विकार करण्यात आला आहे.

6) अप्रत्यक्ष लोकशाहीचे प्रकार-

1) संसदीय लोकशाही.

ज्या लोकशाही व्यवस्थेत कार्यकारी मंडळाचे किंवा शासनाचे दोन प्रमुख असतात, एक वास्तविक प्रमुख व एक नामधारी प्रमुख असतो, त्यास संसदीय लोकशाही असे म्हणतात. संसदीय लोकशाहीत कायदेमंडळातून कार्यकारी

Scanned with CamScanner

मंडळाची निर्मिती होते. मंत्रीमंडळातील मंत्री हा कायदेमं-डळाचा सदस्य असेल, तर त्यास संसदीय लोकशाही असे म्हणतात. संसदीय लोकशाहीची जननी म्हणून उल्लेख केला जातो. भारतामध्ये संसदीय लोकशाही आहे.

2) अध्यक्षीय लोकशाही -

ज्या शासनव्यवस्थेमध्ये कार्यकारी मंडळाचा किंवा शासनाचा एकच प्रमुख असतो. त्यास अध्यक्षीय लोकशा-ही म्हणतात. अध्यक्षीय लोकशाहीत कायदेमंडळातून कार्यकारी मंडळाची निर्मिती केली जात नाही. मंत्रिमंडळाती-ल मंत्री हा कायदेमंडळाचा सदस्य नसतो, त्यास अध्यक्षीय लोकशाही असे म्हणतात. अमेरिकेमध्ये या लोकशाहीचा स्विकार करण्यात आला आहे.

4) लोकशाहीचे गुण -

1) श्रेष्ठ सिद्धांतावर आधार -

लोकशाहीचे जे मुलभूत आधार आहेत ते सर्वमान्य आणि श्रेष्ठ असे सिद्धांत आहेत. लोकशाहीत प्रत्येक व्यक्ती-चा दर्जा हा इतरांसारखाच असतो. सर्वांना समान अधिकार व सुखसोयी प्राप्त होत असतात. लोकशाहीत व्यक्तीस्वा-तंत्र्य तसेच व्यक्तीविकासाला महत्व दिले जाते. सरकार हे बहुमताने निवडून येते तसेच जनहिताचे कार्य करते. लोकशाहीमध्ये सर्वात महत्वाचा सिद्धांत म्हणजे सर्व सत्ता ही जनतेच्या हाती असते. आणि जनता ही सरका-रवर नियंत्रण ठेवत असते. वरील सिद्धांत कोणत्याही शासनव्यवस्थेत आढळत नसल्याने लोकशाही शासनपद्ध-ती सर्वोत्तम आहे, असे म्हणावे लागेल.

2) जनहितासाठी शासन -

लोकशाही शासनपद्धतीचा सर्वात महत्वाचा

गुण म्हणजे हे शासन जनहितासाठी असते. जनतेचे प्रतिनि-धी जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी तत्परतेने कार्य करतात. सरकारवर जनतेचे लक्ष असल्याने सरकार जनहितासाठी विशेष लक्ष पुरविते. त्यामुळे या शासनाला जनकल्याणकारी शासन असे म्हणतात.

3) व्यक्तीचा विकास-

लोकशाही शासनव्यवस्थेत कोणत्याही व्यक्ती किंवा वर्गाना विशेषाधिकार नसतात. प्रत्येक व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्वाच्या विकासाची समान संधी दिली जा-ते. व्यक्तीला आपला व्यक्ति विकास करता यावा यासा-ठी नागरिकांना अनेक अधिकार तसेच स्वातंत्र्य, समता प्रदान करण्यात येते. त्यामुळे कोणताही व्यक्ती इतरांच्या मार्गात अडथळा निर्माण करू शकत नाही. व्य-क्तीला सर्वोच्च पदापर्यंत जाण्याचा अधिकार आहे.

4) नैतिक उन्नती-

लोकशाहीत व्यक्ती-व्यक्तीत कोणत्याही प्रकारचा भेदभाव करता येत नाही. त्यामुळे प्रत्येक व्यक्ती सन्मानाने जगू शकतो. या भावनेमुळे व्यक्तीत आत्मसन्मान, कर्तव्य, परस्परां विषयी प्रेम तसेच सहकार्याची भावना इत्यादी गुणांचा विकास होतो. लोकांत समाजसेवेची भावना निर्मा-ण होते. सरकार हे आपलेच आहे व आपल्यासाठीच कार्य करीत आहे हे मत असल्यामुळे जनता सरकारशी सहकार्य करीत असते. जनतेला मदत करण्याचा, प्रतिनिधी निवड कर-ण्याचा, कायद्यासंबंधी विचार व्यक्त करण्याचा अधिकार आहे. जनतेमध्ये जबाबदारी, सेवाभाव, प्रामाणिकपणा इ. भावना विकसित होत असतात. त्यामुळे कोणत्याही शासन पद्धतीपेक्षा लोकशाही नैतिक विकासासाठी अधिक उपयुक्त असते.

5) राजकीय शिक्षण-

लोकशाही ही अशी शासनपद्धती आहे, की ज्यात स्वतः शासन कार्यात भाग घेण्यासाठी संधी प्राप्त होत असते. यामुळे नागरिकांना शासनासंबंधी तसेच राजकारणासंबंधी विविध गोष्टीचे ज्ञान प्राप्त होते. लोकशाहीत निवडणुका या आवश्यक असतात. निवडणुकीच्या काळात विविध पक्ष सरकारच्या चुकीच्या कार्याला, ध्येय धोरणाला टीका कर-तात. त्यामुळे जनता जागृत होऊन तिला आपोआपच राजकीय शिक्षण मिळत असते.

6) क्रांतीची भिती टळते-

लोकशाही शासनपद्धतीचा आणखी एक गुण म्हणजे या शासनपद्धतीत क्रांतीची भिती नसते. प्रत्येक व्यक्तीला व्यक्तिविकासासाठी समान संधी प्राप्त होत असल्याने नागरिकात असंतोष निर्माण होत नाही. एखा-द्या गोष्टीबाबत मतभेद झाल्यास ते विचारविनिमया-द्वारे सोडविले जातात. या व्यतिरिक्तही जनता सरका-रच्या कामावर संतुष्ट नसेल तर निवडणुकीच्या काळात जनतेला सरकार बदलता येते. हा बदल शांततेच्या मार्गा-ने होत असतो. वरील सर्व कारणाने जनतेत संतोष निर्माण होऊन क्रांती होण्याची भिती नसते.

7) जबाबदारी आणि कौशल्ये यांचा लाभ-

लोकशाही शासनाचा आणखी एक गुण म्हणजे या शासनात जबाबदारी व विशेष कौशल्य यांचा समन्वय साधता येतो. इतर कोणत्याही शासनात असा समन्वय शक्य नसतो. जर ते जबाबदार असतील तर विशेष तज्ञ असतील तर जबाबदार नसतील. लोकशाहीत धोरण नि-श्चीत करण्याचे काम जनतेचे प्रतिनिधी करतात आणि ते जनतेला जबाबदार असतात. धोरण निश्चित केल्यास

Scanned with CamScanner

त्याची अंमलबजावणी करण्याचे काम मात्र उत्तम प्रशासक किंवा विशेषतज्ञाकडे सोपविले जाते. अशारीतीने लो-कशाही व्यवस्थेत जबाबदारी व कौशल्यांचे शिक्षण सहजतेने घडून येते.

स्थैर्य-

लोकशाही शासनात स्थैर्य प्राप्त होते. सरकार हे जनतेच्या इच्छेवर, पाठिंब्यावर निवडून येत असल्यामुळे सरकारला कोणत्याही प्रकारची भिती नसते. जोपर्यंत सरकार जनकल्याणाकडे लक्ष देते, तोपर्यंत त्याच्या स्थैर्या-ची शाश्वती जनता देते. जनतेच्या पाठिंब्याने सर-कारला राष्ट्रविकासाच्या योजना अमलात आणता येत-त. सरकारला स्थैर्य प्राप्त होत असल्याने सरकार दीर्घ मुदतीच्या योजना अंमलात आणते.

लोकशाहीचे दोष-

1) अस्थिर सरकारची निर्मिती-

बहुपक्ष पद्धतीचा स्विकार केल्यास अनेक वेळा कोणत्याही एका पक्षाला बहुमत प्राप्त होत नाही. किंवा अनेक पक्ष एकत्र येवून सरकार स्थापन करतात. या सरकारमध्ये सहभागी झालेला राजकीय पक्ष या सरकारमधून कधी बाहेर पडेल हे सांगता येत नाही. त्यामुळे सरकार अस्थिर बनते.

2] अयोग्य व्यक्तीच्या हातामध्ये सत्ता-

लोकशाहीमध्ये निवडणुकीच्या आधारावर सत्तेची निर्मिती होते. निवडणुकीमध्ये निवडुण आलेल्या प्रत्येक व्यक्तीला राज्यकारभा-र करण्याचे ज्ञान असेलच असे नाही. कारण निवडणुकीमध्ये अनेकजण जात, धर्म, पैसा किंवा इतर गैरमार्गाचा वापर करुन निवडून आलेले असतात. त्यामुळे अयोग्य व्यक्तीच्या हातामध्ये सत्ता असते. अट नसल्यामुळे हा एक लोकशाहीचा दोष दिसतो.

Scanned with CamScanner

3] अशांतता निर्माण करणे-
अनेक पक्ष एकत्र येवून सरकार बनविल्यास सरकारमध्ये राज्यामध्ये अशांततेचे वातावरण निर्माण होते. प्रत्येक पक्षाची विचारसरणी वेगळी असल्यामुळे कोणताही निर्णय घेताना त्यांच्यात ऐक्य निर्माण होत नाही. त्यामुळे अशांतता दिसून येते.

4] बहुमत वादयाची हुकूमशाही निर्माण होते.
निवडणुकीमध्ये ज्या राजकीय पक्षाला बहुमत प्राप्त झाले आहे. त्या पक्षाची किंवा नेत्याची शासनामध्ये एक प्रकारे हुकूमशाही निर्माण होते. बहुमत असल्यामुळे त्यांच्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव पास होऊ शकत नाही. स्वतःला अनुकूल निर्णय होतो. हा एक लोकशाहीतील महत्त्वाचा दोष दिसून येतो.

5] मंद प्रक्रीया-
लोकशाहीमध्ये कोणताही निर्णय घेताना उशीर होतो. निर्णय घेण्याची गती मंद असते. निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत चर्चा केली जाते, विशिष्ट प्रक्रियेच्या आधारावर निर्णय घेतला जातो. त्यामुळे कोणत्याही गोष्टीवर निर्णय घेण्याची प्रक्रिया लोकशाहीत अतिशय मंद आहे, असे दिसून येते.

6] खर्चीकता-
इतर शासनाच्या तुलनेत लोकशाहीचा प्रकार हा खर्चीक आहे. कारण केंद्र, राज्य, स्थानिक सरकारची निर्मिती करण्यासाठी लोकशाहीमध्ये निवडणुका घेतल्या जातात. निवडणुकीत सरकारचा फार मोठ्या प्रमाणात खर्च होतो. इत्यादी विविध प्रकारचे दोष लोकशाही व्यवस्थेत दिसून येतात.

* लोकशाहीतील यशाच्या अटी -

1) राजकीय जागृती-
जनतेमध्ये राजकीय जागृती असणे गरजेचे आहे.

सरकारचे धोरण योग्य आहे की, अयोग्य आहे हे जनतेला समजले पाहिजे. जनतेने सतर्कतेने राजकीय घडामोडीकडे लक्ष दिले पाहिजे. सरकारच्या चुकीच्या धोरणावर टीका केली पाहिजे, तरच लोकशाहीचा प्रयोग यशस्वी होतो.

२) नागरिकांना पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे -

लोकशाहीचा प्रयोग यशस्वी करण्यासाठी देशातील नागरिकांना सामाजिक, राजकीय, आर्थिक बाबींचे पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे. स्वातंत्र्याबरोबरच अधिकार असले पाहिजेत. प्रत्येकानी आपापली कर्तव्य पार पाडली पाहिजेत.

3) समतेचे वातावरण असले पाहिजे -

लोकशाहीच्या यशासाठी समता आवश्यक असते. जात, धर्म, वंश, लिंग, प्रांत इत्यादींच्या आधारावर कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्वांना सर्व क्षेत्रामध्ये समान संधी दिली पाहिजे.

4) अंतर्गत शांतता व सुरक्षितता असली पाहिजे -

लोकशाहीच्या यशासाठी देशांतर्गत, सुरक्षिततेचे वातावरण असले पाहिजे. प्रत्येकाला आपण सुरक्षित आहोत असे वाटले पाहिजे. सुरक्षिततेच्या दृष्टीने कमकुवत असल्यास बाह्यआक्रमणाचा धोका निर्माण होतो.

5) निपक्षपाती न्यायव्यवस्था -

लोकशाहीच्या यशासाठी देशामध्ये स्वतंत्र्य न्यायव्यवस्था असली पाहिजे. तरच योग्य न्याय मिळतो. न्यायाचे वातावरण निर्माण होते. अधिकार व स्वातंत्र्याचे संरक्षण होते.

6) प्रसार माध्यमे -

वर्तमानपत्र हा लोकमताचा आरसा असतो. विचार प्रकट करण्याचे एक साधन असते. वृत्तपत्रातून प्रसारमाध्यमातून सरकारच्या चुका दाखवता येतात. लोकशाहीचा एक आधारस्तंभ म्हणून प्रसारमाध्यमांचा उल्लेख केला जातो.

Scanned with CamScanner

Page No.
Date: / /

9) इतर घटक -
वरील घटकाशिवाय खालील प्रमाणे नमूद केलेल्या घटकाच्या आधारावर लोकशाहीचा प्रयोग यशस्वी ठरु शकतो.
निपक्षपाती निवडणुका झाल्या पाहिजेत
चारित्र संपन्न नागरिक असले पाहिजे
एकात्मतेची भावना असली पाहिजे
खंबीर नेतृत्व असले पाहिजे
जनतेमध्ये सहिष्णुता असली पाहिजे
राजकीय पक्ष असले पाहिजेत.
इत्यादीच्या आधारावर लोकशाहीचा प्रयोग यशस्वी होऊ शकतो.

* लोकशाहीतील अडथळे -
जगात अनेक देशांनी लोकशाहीचा स्विकार केला आहे तरीदेखील संपूर्ण लोकशाही प्रस्थापित होऊ शकली नाही, त्यात काही अडथळे आहेत.

1] प्रादेशिक असमतोल -
भारतिय लोकशाहीतील हा सर्वात मोठा अडथळा आहे. भारताचा भुभाग विस्तीर्ण आहे. नैसर्गिक संपत्तीच्या बाबतीत विविधता आहे. त्यामुळे काही भागांचा विकास झाला तर काही भागाचा विकास होऊ शकला नाही. तसेच निवडुन आलेल्या प्रतिनिधींनी आपल्याच भागाचा विकास केला. त्यामुळे प्रादेशिक असमतोल वाढीस लागला. त्याचा परिणाम देशात अस्थिरता निर्माण होत आहे म्हणून हा लोकशाहीतील अडथळा मानला जातो.

2] जातिवाद -
भारतात अनेक जातीचे लोक आहेत. जात ही जन्मावरुन

ठरते. जाती-जातीतच रोटी-बेटी व्यवहार होतात. जातीनुसा-र काहींना श्रेष्ठ तर काहींना कनिष्ठ मानले जातात. जातीच्या आधारावर चालणाऱ्या राजकारणामुळे लोकशाहीत अडथळा निर्माण होतो.

3] भाषावाद -

भारतात अनेक जातीचे लोक आहेत. जात ही जन्मावरुन ठरते. जाती-जातीतच रोटी-बेटी व्यवहार होतात

भारतात अनेक भाषा बोलणारे लोक राहतात. सध्या २२ भाषांना राष्ट्रभाषेचा दर्जा प्राप्त झालेला आहे. तरीही भाषेच्या नावावर देशात वाद होतात. त्यामुळे लोकशाही-त अडथळे निर्माण होतात.

4] धार्मिक वाद -

भारतात अनेक धर्माचे लोक राहतात. त्यांच्यात धर्माच्या नावावर वाद होतात. धर्माच्या नावावर राजकरण केले जाते. त्यामुळे लोकशाहीत अडथळे निर्माण होतात.

5] नेतृत्वातील दोष -

लोकशाहीतले नेतृत्व अकुशल, बेजबाबदार, नालायक तसेच वाम-मार्गाकडे जाणारे असेल तर लोकशाहीत अडथळे निर्माण होतात.

6] सनदी सेवकांची प्रवृत्ती -

लोकशाहीत निवडून येणाऱ्या प्रतिनिधींना राजकारणाचे ज्ञान असलेच असे नाही. त्यांच्या हाताखाली काम करणारा प्रशा-सकवर्ग अनुभवी असल्याने त्यांच्या हातात सत्तेचे केंद्रीकरण होते. त्याचा गैरफायदा ते घेतात. परिणामी लोकशाहीत अडथळे निर्माण होतात.

7] जनतेचे अज्ञान -

भारतातील बहुसंख्य जनता ही अज्ञानी व निरक्षर आहे. त्यांना आपल्या अधिकाराची जाणीव नाही. त्यामुळे

Scanned with CamScanner

Page No.
Date: / /

जो वर्ग लोकशाहीत जागृत असणे आवश्यक असते. तो उदासीन असतो. त्याचा फायदा सत्ताधीश घेतात. परिणामी लोकशाहीत अडथळे निर्माण होतात.

8] एकात्मतेचा अभाव-

विविधता असलेल्या देशात एकात्मता आवश्यकता असते मात्र ती एकात्मता साधणे कठीण असते. देशात जात, धर्म भाषा आदींच्या आधारावर वाद निर्माण होतात. समाजात अस्थिरता निर्माण होते. त्यामुळे लोकशाहीत अडथळे निर्माण होतात.

9] प्रभावी विरोधी पक्षाचा अभाव-

भारतात बहुपक्ष पद्धती अस्तित्वात आहे. भारतात काँग्रेसची एकाधिकारशाही होती. त्यामुळे प्रभावी विरोधी पक्षाचा अभाव होता. 1990 च्या नंतर देशाच्या राजकीय व्यवस्थेत अस्थैर्य निर्माण झाले. कारण स्थानिक पक्षाचेच महत्व वाढले होते. प्रभावी असा विरोधी पक्ष नसल्याने प्रादेशिक पक्षांच्या सहकार्याने सत्ता मिळविण्याचा प्रयत्न विविध पक्ष करू लागले. परिणामी प्रशासनात अस्थिरता निर्माण होऊ लागली आणि त्यामुळे स्थिर शासन देण्यात अडथळे निर्माण होऊ लागले.

10] पक्षांतराची समस्या-

लोकशाहीत पक्षांतराची समस्या सातत्याने सुरूच असते 'आयाराम गयाराम' चे धोरण असते. कोणतीही तर्कप्रणाली किंवा विचार प्रणाली नाही. त्यामुळे कोणावर विश्वास ठेवावा हा प्रश्न जनतेसमोर असतो. म्हणूनच 52 व्या घटनादुरुस्तीने (1985) पक्षांतर बंदीचा कायदा करण्यात आला. परंतु त्यातुनही अनेक पळवाटा शोधून काढण्यात आल्या.

11] दफ्तर दिरंगाई-

लोकशाहीत नोकरवर्गाची मनमानी असते. कामे वेळेवर करण्याकडे त्यांचे लक्ष नसते. आजचे काम उद्यावर, उद्याचे काम

Scanned with CamScanner

लांबणीवर टाकण्याची प्रवृत्ती असल्याने लोकशाहीत अडथळे निर्माण होतात. कामे वेळेवर होत नाहीत.

12] भ्रष्टाचार-

लोकशाहीत भ्रष्टाचार शिष्टाचार बनला आहे. सत्ताधी-शांपासून ते कर्मचारी वर्गापर्यंत भ्रष्टाचाराची एक साखळी असते. त्यामुळे कोणतीही कामे करताना भ्रष्टाचाराचा अवलंब केला जातो. त्यामुळे लोकशाहीत अडथळे निर्माण होतात.

✗ अडथळ्यांवरील उपाय-

नागरिकांमध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण करणे, त्यासाठी योग्य शिक्षण देणे
शिक्षणातून कर्तव्याची जाणीव करून देणे
जबाबदारीची जाणीव होण्यासाठी, मार्गदर्शन करणे
द्विपक्ष पद्धतीचा स्विकार करणे, जेणेकरून प्रभावी विरोधी पक्ष निर्माण होईल.
निवडणुकीच्या खर्चावर नियंत्रण ठेवणे
विधीमंडळाच्या अधिवेशनावरील खर्चावर मर्यादा घालणे
नेता हा चारित्र्यसंपन्न व सद्गुणी असावा.
देशातील विषमता नष्ट करावी.
सनदी सेवकांचा मनमानी निर्माण न होऊ देणे
सत्तेचे विकेंद्रीकरण प्रत्यक्ष अंमलात आणण्यासाठी जन-तेने सरकारला जाब विचारावा.
इत्यादी.

अशाप्रकारे, सर्व शासन प्रणालीत सर्वश्रेष्ठ शासनप्रणाली लोकशाही आहे. यात व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा विकास होऊ शकतो. जनता सार्वभौम असते.